# पवई पोलीस ठाणे गु.र.क्र.373/2020

श्री हरोष जॉन कट्टुकरण, वय 41 वर्षे, धंदा – व्यवसाय, रा.ठि. फ्लॅट नं. 502, लेक फ्रन्ट सॉलीटेअर, पवई लेकच्या समोर, आदि शंकराचार्य मार्ग, हिरानंदानी, पवई, मुंबई यांचा 3 बि.एच.के. फ्लॅट असून दिनांक 20.07.2020 रोजी रात्री 01.00 वा. च्या सुमारास ते त्यांच्या कुटुंबियांसह वेगवेगळ्या 2 बेडरूममध्ये सर्व दरवाजे व खिडक्या व्यवस्थित बंद करून झोपी गेले. सकाळी 06.45 वा. च्या सुमारास फिर्यादी यांच्या पत्नीस झोपेतुन उठल्यानंतर त्यांना हॉलमधील खिडकी उघडी असल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांनी फिर्यादीसह बेडरूम तपासले असता तीन बेडरूमपैकी मास्टर बेडरूममधील कपाट तपासले असता त्यांना त्यांच्या कपाटातुन सोने व हिऱ्यांचे दागिणे तसेच रोख रक्कम अशी एकुण रू. 26,85,000/– च्या मालमत्तेची चोरी झाल्याचे लक्षात आले. सदरबाबत फिर्यादी यांनी पवई पोलीस ठाणेस येऊन दिलेल्या तक्रारीवरून पवई पोलीस ठाणे, गु.र.क्र. 373/2020, कलम 457, 380 भादविसं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्ह्याच्या घटनास्थळावरून प्राप्त सिसिटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेजमध्ये नमुद पाहिजे आरोपी हा फक्त 10 सेकंद अगदी अस्पष्ट दिसून आला. तसेच सदर आरोपीताचा जाण्यायेण्याचा मार्ग व इतर कोणतीही माहिती तपासात उपलब्ध होत नव्हती.

सध्या सुरू असलेल्या कोरोनाच्या पार्श्वभुमीवर लोक घराबाहेर जाण्याचे टाळत असून फिर्यादी व त्यांचे कुटुंबिय घरात झोपलेले असताना देखिल यातील आरोपीताने वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडत असताना दोन मजले पार्किंग व त्यावरील पाचव्या मजल्यावर गॅस पाईप लाईनच्या साहाय्याने चढुन केलेल्या फिल्मी स्टाईल घरफोडीमुळे सदर स्पायडर मॅन चोराबाबत यातील फिर्यादी व त्यांचे कुटुंबिय तसेच नमुद सोसायटी व आजुबाजुच्या परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

तसेच गुन्हा घडल्यानंतर जवळजवळ 20 दिवस होत आले असताना देखिल गुन्हा उघडकीस न आल्यामुळे पोलीसांचे प्रतिमा पणाला लागली होती. अशातच गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने प्राप्त माहितीवरून अलकापुरी, नालासोपारा या ठिकाणी सापळा रचुन दिनांक 12.08.2020 रोजी आरोपी नामे अजय उर्फ बाबु विजय विश्वकर्मा, वय 24 वर्षे यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्याच्याकडे केलेल्या तपासावरून तो दिनांक 19.07.2020 रोजी नालासोपारा येथुन पवई येथे फिरावयास येऊन नशेमध्ये रात्रीच्या वेळी पडिक जागेच्या मार्गे नाला पार करून झाडावर चढुन त्यानंतर सोसायटीमध्ये प्रवेश करून पाईपाच्या साहाय्याने बिल्डींगवर चढुन घरफोडी केलेली आहे.

त्यानंतर अटक आरोपी अजय उर्फ बाबु विजय विश्वकर्मा, वय 24 वर्षे त्याचेकडुन गुन्ह्यातील चोरीची मालमत्ता घेणारे 1) अमजद अफजल खान, वय 34 वर्षे, 2) राधेश्यामराममुरद सोनी, वय 42 वर्षे व 3) महेंद्र तुलशीराम घांची, वय 30 वर्षे यांना अटक करण्यात आली. यातील मुख्य आरोपी अजय व इतर आरोपी यांच्याकडुन एकुण रू. 24,97,500/– ची मालमत्ता त्यामध्ये देशी विदेशी सोन्या चांदिचे व रत्नजडीत हिऱ्या मोत्यांचे दागिणे हस्तगत करण्यात आलेले आहेत. तसेच आरोपीतांकडुन त्यांनी चोरीच्या मालमत्तेमधुन खरेदी केलेली स्कुटी व वॉशींग मशीन इ. वस्तू हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

सदर कारवाई श्री अंकित गोयल, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – 10, मुंबई, श्री मिलिंद खेतले, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, साकीनाका विभाग, मुंबई, श्री विजय दळवी, प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे, मुंबई, श्री दिलीप धामुणसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक प्रविण महामुनी, पो.ना.क्र. 4925/बाबु येडगे, पो.ना.क्र. 01276/नितीनखैरमोडे, पो.शि.क्र. 03467/सचिन गलांडे, पो.शि.क्र. 060836/अभिजीत जाधव व पो.शि.क्र 111096/प्रशांत धुरी यांनी केली आहे.